# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik 422004
Tel: 0253 – 2539225/229
Email: ugexamhom@muhs.ac.in Website: www.muhs.ac.in

MUHS

**डॉ. संदीप सिताराम कडू**
एम.बी.बी.एस.,एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र), एम.बी.ए.,
पी.जी.डी.एच.एच.एम.,पी.जी.डी.एम.एल.एस.,सी.एफ.एम.जे
परीक्षा नियंत्रक

**Dr. Sandeep Sitaram Kadu**
M.B.B.S., M.D. (Forensic Medicine),
M.B.A., P.G.D.H.H.M., P.G.D.M.L.S.,C.F.M.J.
**Controller of Examinations**


जा. क्र. मआविवि/एक्स४/3123 /२०२४ दि.१८/०४/२०२४

**परिपत्रक क्र.६०/२०२३**
**अतिमहत्वाचे/ तात्काळ /ई-मेलद्वारे**

प्रति,
मा. अधिष्ठाता/ प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
मआविवि, नाशिक

विषयः- उन्हाळी - २०२४ च्या परीक्षा अर्जाबाबत...
संदर्भ:- विद्यापीठ परिपत्रक क्र. ३९/२०२३ दि.२२/०७/२०२३

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रान्वये उन्हाळी -२०२४ च्या परीक्षेसाठी परीक्षा अर्ज माहे मे व जून मध्ये सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर परीक्षा अर्ज सादर करताना खालील प्रामणे कार्यवाही करण्यात यावी.

१) महाविद्यालयाने उन्हाळी-२०२४ च्या परीक्षेचे परीक्षा अर्ज विद्यापीठाने वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आलेल्या दिनांकास विहीत शुल्कासह महाविद्यालयीन प्रतिधिनिद्वारे स्वहस्ते विद्यापीठात सादर करावेत.

२) महाविद्यालयाने परीक्षा अर्जाचे शुल्क सर्व विद्यार्थ्याचे एकत्रित IMPS, NEFT, RTGS किंवा विद्यापीठातर्फे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अधिकृत संगणिकीय प्रणाली इ. द्वारे विद्यापीठास जमा करावे. विद्यार्थीनीहाय शुल्क (संगणीकृत प्रणालीमध्ये किंवा धानकर्षाद्वारे) स्विकारले जाणार नाही. त्यामूळे महाविद्यालयाने सर्व विद्यार्थ्यांचे शुल्क विद्यापीठास सादर करतांना एकत्रितचा सादर करण्यात यावे.

३) उक्त शुल्क विद्यापीठास सादर केल्याचे पुरावे उदा.UTR No., RTGS No. संगणकीय पावती इ. महाविद्यालयाने परीक्षा अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

४) प्रथम वर्षासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज सादर करतांना विद्यापीठातर्फे प्रवेशास मान्यता प्रदान केल्याच्या पत्रासह विहत वेळेत शुल्कासह सादर करावे.

५) ज्या विद्यार्थ्यांना अद्याप प्रवेश नियामक प्राधिकरण (ARA), मुंबई किंवा विद्यापीठाच्या पात्रता विभागातर्फे (Eligibility Section) प्रवेशात मान्यता प्रदान केलेली नाही किंवा प्रलंबीत आहे अशा सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज देखील विहीत वेळेत शुल्कासह सादर करावे.

६) उक्त प्रामणे ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्रवेश नियामक प्राधिकरण (ARA), मुंबई किंवा विद्यापीठातर्फे मान्यता प्रदान केलेली नाही अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबतची कार्यवाही महाविद्यालयाने तात्काळ करुन घ्यावी अन्यथा, सदर विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश पत्र विद्यापीठातर्फे निर्गमित केले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

७) ज्या महाविद्यालयाचे किंवा विद्यार्थ्यांचे न्यायलयीन प्रकरण प्रलंबीत आहे अशा महाविद्यालयाचे परीक्षा अर्ज सादर करतांना न्यायलयाचे आदेश सोबत जोडणे बंधनकारक आहे.

८) महाविद्यालयाने परीक्षा अर्ज विहीत मुदतीतच विद्यापीठास महाविद्यालयीन प्रतिनीधीद्वारे स्वहस्ते सादर करण्यात यावे, न्यायलयीन प्रकरणा व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर येणारे परीक्षा अर्ज स्विकारले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

९) महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज घेवून विद्यापीठात नये. **विद्यार्थ्यांद्वारे आलेले अर्ज विद्यापीठाद्वारे स्विकारले जाणार नाही.** तसेच, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक, आर्थिक नुकसाणास किंवा न्यायलयीन प्रकरणास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद द्यावी.

सदर परिपत्रक संबंधित सर्व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणुन दयावे. तसेच, सदर परिपत्रकास महाविद्यालयाच्या सूचना फलकावर व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी.

सही- 18/6/24

**डॉ. संदीप सिताराम कडू**
**परीक्षा नियत्रंक**

**प्रत सविनय सादर–**

१) मा. कुलगुरु, मआविवि, नाशिक.
२) मा. प्रति- कुलगुरु, मआविवि, नाशिक.
३) मा. कुलसचिव, मआविवि, नाशिक.
४) विभागप्रमुख, संगणक विभाग, मआविवि, नाशिक.

आपणास याद्वारे सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.muhs.ac.in) प्रसिध्द करण्यात यावे.